# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gansters**

**Police Station** :- **Asegaon**

**Date of Good Work done** :- **19/04/2022**

**Brief of the work done :-**

पिस्तुलचा धाक दाखवत मंगरुळपीर-वाशिम मार्गावरील पेट्रोल पंपावरील रोकड लुटणाऱ्या 03 दरोडेखोरांना @PS_Asegaon पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले असून या दरोडेखोरांविरुद्ध कडक कारवाई सुरू आहे.

---

## बिटोडा भोयर येथील आनंदी पेट्रोलपंपावरील पिस्तुल दाखवून कॅश लुटणारे तीन आरोपी जेरबंद

फुलचंद भगत



वाशिम ते मंगरूळ पिर रोड वरील बिटोडा भोयर येथील आनंदी पेट्रोलपंपावर 01 मार्च 2022 रोजी पेट्रोल पंपावरील कामगारांकडून देशी कट्टा लावून रक्कम पळविल्याची घटना घडली होती. पेट्रोल पंपावरील कामगार गौतम विठ्ठल खंदारे हे 1 एप्रिल 22 रोजी सायंकाळी 7 : 30 वाजे दरम्यान एकटेच असतांना,काळया रंगाची पल्सर कंपनीची मोटार सायकलवर २५ ते ३० वयोगटातील तीन ईसम तोंडाला बांधुन आले त्या विमांनी प्रथम ५० रू व पुन्हा ३०० रु. में पेट्रोल टाकुन घेतले आणि पेट्रोलचे पैसे दिले गौतम खंदारे हे पैसे मोजत असतांना त्या तिघपैकी एकानेगौतम खंदारे यांचे गळ्यात हात टाकुन पकडुन, त्याच्या जवळील पिस्तुल (देशी कट्टा) गौतम खंदारे यांचे डोक्याला लावली तेव्हा दुस-याने गौतम खंदारे यांचे गळयात असलेली पैशाची बॅग व त्यातील १४,००० / रू. जबरीने हिसकावुन काढून घेतली आणि ते तिथे त्या मोटार सायकलवर बसुन वाशिम रोडने भरधाव वेगाने पळून गेले. यावरून आसेंगांव पोलीस स्टेशन मध्ये 52/2022 कलम 397, 34 भादंवि सहकलम 3, 25 आर्म्स ॲक्ट अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अप्पर पोलीस अधिक्षक वाशिम, गोरख भामरे,मंगरूळ पिर चे उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे, यांनी सदर गुन्हयाची गांभीयनि दखल घेउन आरोपींचा शोध घेण्याकरिता मार्गदर्शक सुचना दिल्या. आरोपी सर्जेराव ऊर्फ प्रिन्स रोहीदास होलपदे,देवानंद ऊर्फ लखन बालाजी दुधमोगरे व राजु एकनाथ चव्हाण यांना ताब्यात घेउन 16 एप्रिल रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदरच्या आरोपींकडे विचारपुस केली असता, त्यांनी एकत्रितपणे याच प्रकारचे अर्धापुर पोलीस स्टेशन हद्दीतील पद्मावती पेट्रोलपंपावर जबरी चोरी केली यासोबत लिंबगांव पोलीस स्टेशन हद्दीतील वैशालीताई पावडे पेट्रोलपंपावर जबरी चोरी केली तसेच महागांव पोलीस स्टेशन हद्दीतील दत्त पेट्रोलपंपावर जबरी चोरी केली. मावत पोलीस स्टेशन हद्दीतील रुद्रीपाटीजवळ कैलास पेट्रोलपंपावर जबरी चोरी केली. या अरोपींनी वरील सर्व गुन्हयांची कबुली दिली. सदरचे गुन्हे केल्यानंतर ते फरार झाले होते. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक बच्चन सिंह,अप्पर पोलीस अधिक्षक गोरख भामरे, मंगरुळपिर चे उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे, यांचे मार्गदर्शनाखाली आसेगांव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरिक्षक संदीप नरसाळे, पोलिस उपनरीक्षक रविकिरण खंदारे व पोलीस शिपाई गणेश बर्गे यांनी पार पाडली.